# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. २९९/२०१९ दिनांक ०५/०९/२०१९**

**दिलीपसिंघ कॉलीनमध्ये फायरींग करणाऱ्या अभिलेखावरील गुन्हेगारांना जिवावर उदार होऊन वजीराबाद पोलीसांनी पकडले.**

---------------------------------------------------------------------------------------------

नांदेड जिल्हयातील फायरिंग व खंडणी सारख्या वाढत्या गुन्हयांना आळा घालुन गुन्हेगारांच्या मुसक्या आवरण्यासाठी नुतन पोलीस अधिक्षक श्री विजयकुमार मगर यांनी ठोस उपाय योजना राबवुन कठोर कार्यावाही करण्याच्या सुचना नांदेड शहरातील सर्व प्रभारी अधिकारी यांना दिल्या होत्या . त्याप्रमाणे अलीकडच्या काही दिवसात नांदेड जिल्हा पोलीस दलाकडुन अवैध शस्त्रे बाळगणारे यांचेविरुध धडाडीने मोहिम उघडुन त्याचे समुळ उच्चाटन करण्याचे दिशेने धडक कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

गणेश उत्सवाच्या पार्श्वभुमीवर सर्व पोलीस ठाण्याच्या हद्यीत कडेकोट बंदोबस्त नेमण्यात आला होता. त्याचाच एक भाग म्हणुन शहरातील संवेदनशिल ठिकाणे, गर्दीचे ठिकाणे ,मिश्र वस्ती या ठिकाणी फिक्स पॉईंट ,पेट्रोलींग, नाकाबंदी लावण्यात आली आहे. गणेश उत्सवा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन या करीता वरिष्ठ अधिकारी जातीने लक्ष ठेवुन होते.

दिनांक 05/09/2019 रोजी रात्री 12.30 वाजण्याचे सुमारास वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री संदिप शिवले हे हद्यीत गस्त घालीत असताना त्यांना दिलीपसिंग कॉलनी या ठिकाणी दोन गटात वाद चालु असल्याची माहिती मिळाली . सदरची माहिती मिळताच स्वतः पोलीस निरीक्षक संदिप शिंवले व गस्तीवरील पोलीस नाईक झांबरे ,पोलीस शिपाई पाटील, संतोष बेल्लुरोड,बिरादार,जगताप,अवातिरक यांना घेवुन तात्काळ दिलीपसिंघ कॉलनी कडे अवघ्या तिन मिनिटात धाव घेतली . तेथे पोहचताच त्या ठिकाणी दोन गटात जोरात वाद विवाद चालु असल्याचे दिसले. तेवढयात एका गटातील ईसमाने अचानक त्याचे जवळील कमरेचे पिस्टल काढुन समोरील गटाचे दिशेने एक राऊंड फायर केला. घटनास्थळी पोहचलेल्या पोलीसांनी क्षणाचाही विलंब न करता प्रसंगावधान राखुन पिस्टल मधुन दुसरा राऊड फायर करण्याच्या तयारीत असलेल्या इसमास धाडसाने त्याचेवर झडप घालुन साथिदारासह रंगेहाथ पकडले.त्याचे ताब्यातील पिस्टल ताब्यात घेवुन तपासणी केली असता पिस्टलचे बॅरल मध्ये एक जिवंत राऊंड असल्याचे लक्षात आले. पोलीसांनी अत्यंत काळजीपुर्वक सदर पिस्टल अनलोड करुन पंचासमक्ष एक पिस्टल व तिन जिवंत काडतुसे जप्त केले तसेच फायर करणारा गुन्हेगार नामे 1) प्रदिप ऊर्फ सोहम लालचंद रोऊत्रे वय 32 वर्षे रा.जुना मोंढा नांदेड व त्याचा साथिदार नामे अन्वर अली अक्बर अली वय 42 वर्षे रा.दिलीपसिंघ कॉलनी यांना ताब्यात घेतले.

सरकारतर्फे फिर्यादी पोलीस शिपाई संतोष शिवन्ना बेलुरोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे वजीराबाद नांदेड येथे गु.र.न. 276/2019 कलम 307,34 भारतीय दंड विधान सह कलम 3/25, 27 भारतीय हत्यार कायदा

प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास श्री. सुनील बडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे वजीराबाद, नांदेड हे करीत आहेत. आज रोजी सदर आरोपीतांना रिमांड मिळणे कामी मा.न्यायालयात हाजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना दिनांक 09/09/2019 रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

उप विभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, पोलीस निरीक्षक, वजिराबाद व कर्मचारी यांनी सदर घटणेची त्यांना माहिती मिळताच क्षणाचाही विलंब न करता तत्परता दाखवुन अवघ्या तिन मिनिटात घटणास्थळी पोहचुन प्रसंगावधान,दाखवुन धाडसाने गुन्हयातील आरोपी यांना जेरबंद केले आहे.त्याचे या धाडसाचे पोलीस अधिक्षक **श्री विजयकुमार मगर** यांनी कौतुक करुन अभिनंदर केले व यातील कामगीरी करणारे अधिकारी व कर्मचारी यांना 25,000/- रुपयाचे बक्षीस जाहिर केले आहे.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड